जा.क्र.प्राफसंकें/कं.का./2540/२०२१
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला.
दिनांक :– 26 NOV 2021

प्रति,

सोबत जोडल्याप्रमाणे

विषय :– कंत्राटी पद्धतीने मनुष्यबळ पुरविणेबाबत.

महाशय,

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र वेंगुर्ला येथील **Bio- efficacy evaluation of IKI-3106 100DC on Maize against Fall Armyworm** हा प्रकल्प मका या पिकावरील लष्करी अळीवर असून त्यासाठी निळेली येथे प्रयोग घेण्यात येणार आहे. सदर प्रकल्पाकरीता दैंनदिन कामे करणेसाठी सन २०२१–२२ **(दि. १३/१२/२०२१ ते २०/०३/२०२२ पर्यंत)** या कालावधीकरीता अंदाजे ०१ **कंत्राटी कामगार** पुरविण्यासाठी मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत. तरी आपणांस विनंती करण्यात येते की, खालील तपशीलात नमूद केल्याप्रमाणे कंत्राटी कामगारांचे प्रती दिनी प्रती कामगार (आठ तास) दरपत्रक निम्नस्वाक्षरीकार यांच्या नावे दिनांक १०/१२/२०२१ पूर्वी/पर्यंत या कार्यालयास सादर करावे.

**ठेकेदाराने पाळावयाच्या अटी व शर्ती :–**

१. ठेकेदाराने एकूण कामाचे स्वरुप निळेली येथील जागेवर प्रत्यक्ष पाहून त्याप्रमाणे संपूर्ण कामाचा एकूण खर्च दरपत्रकात नमुद करावा.
२. कामाचे स्वरुप व किती काम करावयाचे या बाबत निम्नस्वाक्षरीकार/विभाग प्रमुख यांनी ठरवून दिल्याप्रमाणे काम करणे आवश्यक आहे, व काम त्यांचे देखरेखीखाली करावयाचे आहे.
३. ठेकेदाराने नेमलेल्या मजूरांना श्रम व रोजगार मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या F.No. 1/13(1)/2017-LS II दि. १७/०३/२०१७ च्या अनुषंगाने शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.
४. कामाची अदायगी महिना पूर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करतेवेळी मा. प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पूर्ण केल्याबाबत दाखला जोडणे आवश्यक आहे.
५. अर्धवट काम सोडल्यास किंवा काम अपूर्ण असल्यास कामाच्या बिलाची अदायगी होणार नाही व आपले काम पुढील कामाच्या वेळी ग्राहय धरले जाणार नाही.
६. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.
७. ठेक्यातील इतर कामे विभागाने कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी करण्याचे ठरविल्यास सदर कामे कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी करणे ठेकेदारास व त्याच्या कामगारास बंधनकारक राहील.
८. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरांव्यतिरिक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार नविन कामगार लावण्याचा अधिकार विभाग प्रमुख यांना राहील.
९. प्रक्षेत्रावरील दिलेल्या सुचनेनुसार करावयाची कामे विभागाच्या सोयी व गरजेनुसार करणे ठेकेदारास बंधनकारक राहील तसे न केल्यास ठेका त्वरीत बंद करण्यात येईल.
१०. ठेकेदाराचे पॅन कार्ड व बॅंक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेक्यातील कामगारांची बॅंक खाती असणे व संबंधित खात्याची माहिती कार्यालयास देणे

आवश्यक आहे.

११. ठेकेदार आणि त्यांचे कामगार यांनी केलेल्या कामाची अदायगी ही ठेकेदाराने स्वत:च करावयाची असून कार्यालयाचा कोणताही कर्मचारी त्यात सहभाग घेणार नाही.

१२. ठेकेदाराने ठेका कामगारांना कामाचे वेतन व त्यानुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता संबंधित ठेका कामगाराच्या नावाने रेखांकित धनादेशाव्दारेच (Account payee cross Cheque) करावे.

१३. ज्या कंपनीस/संस्थेस/व्यक्तीस ठेका सोपविण्यात येईल त्यांनी त्याबाबतच्या अटी व शर्ती नुसार करार करणे आवश्यक राहील.

१४. कंपनी/संस्थेतर्फे/ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ कार्यालयावर राहणार नाही.

१५. ठेकेदारामार्फत दिल्या जाणाऱ्या वरील सेवा/सुविधा इत्यादी बाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी सुचविलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

१६. उपरोक्त कामासाठी ठेकेदारामार्फत ज्यांना काम देण्यात येणार आहे. त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे नियम, अटी व शर्ती लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगीक लाभ अनुज्ञेय/लागू राहणार नाहीत. त्यांच्या सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधनाबाबत हे विद्यापीठ प्रशासन व शासन जबाबदार राहणार नाही.

१७. इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख यांना राहतील.

सहयोगी संशोधन संचालक

प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला

ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग

# <u>ठेकेदारी पध्दतीने मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठीचे दरपत्रक</u>

दिनांक :–

प्रति,

मा. सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक फळ संशोधन केंद्र,
वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग.

**विषय** :– सन २०२१–२२ या हंगामात ठेकेदारी पध्दतीने मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठीचे दरपत्रक

संदर्भ :–

महोदय,

वरिल संदर्भिय पत्रानुसार प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला येथील **Bio- efficacy evaluation of IKI-3106 100DC on Maize against Fall Armyworm** प्रकल्पाकरीता सन २०२१–२२ या हंगामात (१३ डिसेंबर, २०२१ ते २० मार्च, २०२२ या कालावधीत) पशु पैदास केंद्र, निळेली येथे प्रक्षेत्रावरील विविध कामे ठेकेदारी पध्दतीने करण्यासाठी मी रु. (अक्षरी रु. ..........................................................) प्रती दिन प्रती मनुष्यबळ याप्रमाणे आवश्यक ते मनुष्यबळ पुरवठा करण्यास तंयार आहे. तसेच ठेकेदारी पध्दतीने मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठीच्या अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य आहेत. व त्या माझ्यावर बंधनकारक राहतील. त्यानुसार अटी व शर्तींचे मी पालन करेन.

कळावे.

आपला/आपली विश्वासू,

(.......................................)

ठेकेदाराचे पूर्ण नांव व पत्ता

........................................................................
........................................................................
........................................................................
........................................................................
........................................................................